# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २४–२०१०/ दिनांक :

श्री. विठ्ठल रामचंद्र जाधव ,
रा. रामपूर, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. विठ्ठल रामचंद्र जाधव, रा. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दि. ११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ९.१.२००४ रोजी अर्ज करुन एकूण रु. ४९७०/– अनामत रक्कम भरली आहे. त्याचा पावती क्र. ३२३७८९३ असा आहे. तक्रारदार यांनी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वीज जोडणी देण्याचा आदेश मिळावा अन्यथा विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. आदेश मिळताच चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली आहे.

तक्रारदाराने मिटरची किंमत रु. २२५०/–, कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/– ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे परत मिळावी व त्यावर व्याजही मिळावे अशी विनंती केली आहे. तक्रारदार यांनी वि.प.ने तक्रारीचे निराकरण न केल्यामुळे झालेल्या मानसिक त्रासापोटी मंचाकडे धाव घ्यावी लागली त्यापोटी रु. २०००/– मिळावेत अशी विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. ५.४.२०१० मंचासमोर सुनावणीवेळी दाखल केलेल्या अहवालानुसार तक्रारदार यांनी शेती कनेक्शनसाठी दि. ९.१.२००४ रोजी अनामत भरली आहे. त्यांच्या जागेची तपासणी दि. १५.२.२०१० रोजी केली असतां, संच मांडणी केल्याचे दिसून आले नाही. संच मांडणी व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वीज जोडणी देण्यात येईल असे सांगितले.

वि.प.ने पुढे असे सांगितले की, अनामत रक्कम ही तक्रारदाराने शेड्यूल ऑफ चार्जेस पूर्वी भरलेली असल्यामुळे परत करता येणार नाही, परंतु कपॅसिटर टेस्टिंग फी व करारपत्र फी बिलातून परत करण्यात येईल. सुनावणीचेवेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित.

प्रतिनिधींनी आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ विद्युत नियामक आयोगाचा केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६ चे आदेशावर भर दिला आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस भरलेली मिटरची किंमत रु. २२५०/– वि.प.कडून परत देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदार हा रु. २०००/– नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

तक्रारदार यांनी चाचणी अहवाल देताच व त्याने संच मांडणी व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी देण्यात यावी.

<u>कारणमिमांसा</u>

वि.प.च्या लेखी म्हणण्यानुसार कपॅसिटर टेस्टिग फी रु. १००/– व करार फी रु. २०/– तक्रारदारास बिलातून परत करण्यात येईल म्हणजे तक्रारदाराचा तो हक्क मान्य केला आहे.

उभयबाजूंच्या कथनानुसार व पावतीची झेरॉक्स पहाता, तक्रारदार यांनी दि. ९.१.२००४ रोजी रु. ४९७०/– भरल्याचे दिसून येते व ती बाब वि.प.ने आपल्या लेखी अहवालात मान्य केली आहे. वि.प.च्या म्हणण्यानुसार शेड्यूल ऑफ चार्जेस पूर्वीच मिटरची किंमत भरली असल्याने ती परत करता येणार नाही हे म्हणणे विद्युत नियामक आयोगाचा दि. ८.९.२००६ चा आदेश पहाता, ग्राह्य धरता येत नाही. श्री. खापरे ग्राहक प्रतिनिधी यांनी मा. लोकपालांचा यांचा आदेश दि. २५.२.२००९ (केस क्र. ११/२००९) मंचासमोर सादर केला. तसेच मा. विद्युत नियामक आयोग यांच्या समोर केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००७ चा आदेशही आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ मंचासमोर हजर केला. तक्रारदाराचा अर्ज दि. ९.१.२००४ चा आहे, त्याचदिवशी अनामत रक्कम भरली आहे. विद्युत पुरवठ्याचा कालावधी व विद्युत पुरवठ्याच्या इतर अटी कृती मानके विनियम २००५ मधील परिशिष्ट अ हे दि. २०.१.२००५ पासून अंमलात आले आहेत.

तक्रारदाराचा दि. ९.१.२००४ चा अर्ज प्रलंबित असलेने मा. लोकपाल यांचा केस क्र. ११.०९ दि. २५.२.२००९ चा आधार घेवून तक्रारदार यांस कनेक्शन दिल्याने मा. विद्युत नियामक आयोगाच्या दि. ८.९.२००६ च्या आदेशानुसार शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे मिटरची किंमत तक्रारदार यांस परत मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे व वि.प.ची ती रक्कम परत देण्याची जबाबदारी आहे. तक्रारदार यांना केस क्र. ७४/२००७ दि. ३.३.२००८ च्या मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये वि.प.ने मा. आयोगाला ८.९.२००६ च्या आदेशाचे पुनर्निरीक्षण करण्याची विनंती केली आहे.

"MSEDCL be permitted to refund the meter cost by adjusting it through enegy bill. "

ही विनंती मान्य करण्यात आली आहे व तसे आदेश दिले आहेत. त्यामुळे तक्रारदार यांस मिटरची किंमत रु. २२५०/- देणेची वि.प.ची कायदेशीर जबाबदारी आहे. वि.प.च्या म्हणण्यानुसार शेड्यूल ऑफ चार्जेस पूर्वीची अनामत भरलेली रक्कम परत देता येणार नाही हे अमान्य करावे लागेल. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

तक्रारदार याने विद्युत पुरवठा मिळावा अशी विनंती केली आहे व त्यांस आदेश देताच चाचणी अहवाल सदर करीत आहे अशी हमी दिली आहे. त्यामुळे त्यामुळे तक्रारदाराने टेस्ट रिपोर्ट वि.प.स त्वरित द्यावा. त्यानंतर संच मांडणी, तपासणी व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर वि.प.ने प्राधान्यक्रमानुसार तक्रारदार यांस वीज जोडणी द्यावी. तक्रारदाराची दुसरी विनंती मानसिक त्रासापोटी रु. २०००/- मिळावेत, कारण त्याचे अर्जाचे निराकरण झाले नाही. परंतु भरपाईपोटी रु. २०००/- ची मागणी ही केवळ अर्जाचे निराकरण झाले नाही व मंचाकडे धाव घ्यावी लागली म्हणून मागणी केली आहे. तसेच भरपाईची रक्कम रु. २०००/- ची मागणी कोणत्या आधार केली ही मंचासमोर सबळ पुराव्याने सिध्द केले नाही, केवळ अर्जाचे निराकरण झाले नाही यामुळे भरपाई तक्रारदारास देणे योग्य होणार नाही, कारण तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दिला नाही त्यामुळे पुढील कृती होवू शकली नाही. तक्रारीतील कथन पहाता, रु. २०००/- भरपाई मिळणेस तक्रारदार हक्कदार नाही त्यामुळे ती मागणी फेटाळण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

# आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस मिटरची किंमत रु. २२५०/-, कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/- व करारपत्र फी रु. २०/- अशी एकूण रक्कम रु. २३७०/- द्यावेत. सदरची रक्कम एक रकमी चेकने अथवा डिमांड ड्राफ्टने तक्रारदार यांस द्यावी व तशी पावती घ्यावी.

३) तक्रारदार यांनी टेस्ट रिपोर्ट त्वरित वि.प.कडे द्यावा व तो दिल्यानंतर वि.प.ने संच मांडणीची तपासणी करुन व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी तक्रारदारास द्यावी. तक्रारदाराची मानसिक त्रासापोटी व मंचाकडे दाद मागावी लागणी या कारणास्तव रु.२०००/- ची मागणी फेटाळण्यात येत आहे.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१० ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :